ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-III October 2012

# नाटक हा वाड्.मयप्रकार की प्रयोगप्रकार मानावा?

प्रा. डॉ. सुनील म. पवार,
ज. ए. इ. चे महिला महाविद्यालय,
स. वा. जोशी विद्यासंकुल,
डोंबिवली (पूर्व) – 421201.


मराठी साहित्याचा प्रारंभकाल 1843 पासून मानण्यात येतो. विष्णुदास भावे हे मराठी रंगभूमीचे जनक मानले जातात. त्यांच्या कार्याचा प्रारंभकाल 1843 पासून झाला आहे. इंग्रजी नाटकांचे होणारे प्रयोग, विद्यापीठाची स्थापना, संस्कृत नाटकाचे अनुवाद, इंग्रजी नाट्यकृतीचा परिचय व मुख्य म्हणजे इंग्रजी नाट्यकृतींची निर्मिती यामुळे मराठी रंगभूमी अधिकाधिक उत्कर्ष पावू लागली.

कथा, कविता, कादंबरी या वाड्.मयप्रकाराचे स्वरुप भिन्न असते. जीवनानुभव व्यक्त करण्याचे सामर्थ्य सर्वच वाड्.मय प्रकारांत असते. परंतु नाटकातून नाट्यानुभव समर्थपणे व्यक्त होतो. 'नाटक' ही रंगभूमीवर दृष्यात्मक रुपाने प्रयोगित होईल अशी वाड्.मयीन रचना असते या दृष्टीने नाटक ही दृक्–श्राव्य–काव्य कला आहे. कथा कादंबरीचा एकांतात आस्वाद घेता येतो, तसे नाटकाचे होत नाही या अर्थाने नाटक हे प्रयोगसापेक्ष, रंगभूमीसापेक्ष आहे.

कोणत्याही नाट्यसंहितेचा अभ्यास करता नाटकातील निरनिराळ्या घटकांच्या परस्परसंबंधाचा विचार करणे महत्वाचे आहे. त्यादृष्टीने नाटकातील महत्वाचे घटक येणेप्रमाणे– 1. कथानक (Plot), 2. स्वभावचित्रणे, पात्रे, (Character) 3. संवाद / भाषाशैली, (Diction) 4. विचार, (Thought) 5. संघर्ष, (Conflict) 6. देखावे, सजावट (Decoration) रंगमंचाचे दृष्य भाग, नेपथ्य, प्रकाशयोजना, रंगभूषा इत्यादी, 7. रंगसूचना (नाट्यसूचना), 8. संगीत. (Music)

या सर्व विविध घटकांचा एकात्म आकृतिबंध म्हणजे "नाटक" असे म्हणता येईल. नाटक हे कवितेसारखे वा गद्यासारखे नसते, जरी त्यात दोन्ही गोष्टी असल्या तरी जर तुम्ही एखादी कविता वा एखादा उतारा शांतपणे स्वतःशीच वाचला तर तुमचे वाचन हे अपुरेच ठरते असे नाही. परंतु नाटकाबाबत असे म्हणता येत नाही. कारण नाटकाची संहिता ही केवळ कागदावर लिहिली जाण्यासाठी अस्तित्वात येत नसते तर तिचा अवतार हा प्रयोगासाठी होतो. बऱ्याच नाटककारांच्या बाबतीत तर लिखित संहिता ही निर्मितीसाठी आवश्यक असणारा एक उपघटकच असतो.

नाटक हा वाड्.मयप्रकार आहे की प्रयोगप्रकार या विधानाचा पाठपुरावा करता 'वाड्.मयाचे आकार आणि प्रकार' मानायला पाहिजे.




यावरुन नाटक हे दोन प्रकारे मानावे. नाटक (वाड्.मयप्रकार) आणि नाटक (प्रयोगप्रकार) असे नाटकाचे दोन प्रकार मानण्यात येतात.

नाटकाच्या संहितेवर आधारित प्रयोग होतात आणि नाट्यप्रयोगाच्या आधाराला संहिता आवश्यक असते. प्रयोगाचे अस्तित्व हे संहितेवर अवलंबून असते. परंतु संहिता ही प्रयोगावर अवलंबून असत नाही. संहिता ही प्रयोगनिरपेक्ष राहू शकते. नाटकांच्या संहिता पाहून आपल्याला जाणवते की जशी संहिता वाड्.मय म्हणून सरस असते तशी ती प्रयोग म्हणून सरस असते.

नाटकाचा 'साचा' हा प्रयोगबद्ध मजकूर असतो. तो मजकूर प्रयोगासाठीच लिहिला जातो. नाटकातील प्रसंग, संवाद, नाटकाची आकृती तसेच नाटकाची लिखित संहिता ही प्रयोगाच्या वेळी कायम असते. त्याच्या साच्यात कोणताही बदल होत नाही. तसेच नाटकाचे रुपांतर होत नाही. रुपांतरामध्ये संपूर्ण तंत्र बदलले जाते. परंतु नाट्यप्रयोग आणि नाट्यसंहिता हे जसेच्या तसे कायम राहतात. म्हणूनच नाटकाचा प्रयोगप्रकार हा वाड्.मयप्रकारच असतो.

या सर्व विवेचनावरुन आपल्या असे लक्षात येते की, नाटक हा वाड्.मयप्रकार देखील आहे तसेच नाटक ही एक प्रयोगसिद्ध कला देखील आहे. साहित्याच्या दृष्टीने नाटकाचा विचार करता नाटकाचे वाड्.मयातील स्थान व प्रयोगातील स्थान हे दोन्ही समसमान पातळीवर असते. ते दोन एकमेकांचे अविभाज्य घटक मानले जातात. कारण आपण ज्या वेळी नाटकाला मानवी देहाची उपमा देतो त्यावेळी त्याचा प्रयोग हा नाटकाचे असलेले मस्तक असते जे आपण कधीच वेगळे करु शकत नाही. नाटकाचा इतिहास, नाटकाची संहिता, नाटकाचे घटक, नाटकाचे वाड्.मयातील स्थान, नट–नाटककार यांचा परस्परसंबंध या सगळ्या अंगांच्या विचारातून नाटक हा वाड्.मयप्रकार आहे की प्रयोगप्रकार या विधानाचा हा थोडक्यात केलेला उहापोह!